**नि.दि.दा. क्र.८७/२०११ मधील निशाणी क्र.६४ वरील आदेश.**

**पंढरीनाथ कंक वि. गणपत कंक**

(दि. ३०/०७/२०२४ रोजी पारीत.)

प्रतिवादींनी प्रस्तुचा अर्ज दाखल करुन त्यांच्याविरुद्ध झालेला 'उलटतपास नाही' असा पारीत करण्यात आलेला आदेश रद्द होवून मिळणेकामी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याचा आहे. परंतु प्रतिवादीचा कुलमुखत्यार नोकरीला पुणे येथे असल्यामुळे न्यायालयात तारखेस हजर राहु शकला नाही. त्यामुळे, मे.न्यायालयाने 'उलटतपास नाही' असा आदेश पारित केलेला आहे.

०३. वादी यांनी प्रतिवादी यांच्या अर्जावर म्हणणे देऊन हरकत घेतली आहे. वादीच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज सुमारे ५ वर्षांनंतर प्रतिवादीने दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादीने दिलेली सर्व कारणे ही मोघम व कायदेशीर नाहीत. करीता वादीने सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचे प्रकरण हे अंशतः पुराव्याकामी प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यानंतर दि.२७/०२/२०१८ रोजी वादीचा सरतपास पुर्ण झाल्यानंतर प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ सदर दिवशी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर नि.क्र.५२ नुसार प्रतिवादींच्या मागणीप्रमाणे उलटतपास नाही हा आदेश बाजुला करण्यात येउन प्रतिवादीस पुन्हा उलटतपास घेण्याची संधी देण्यात आली. परंतु, प्रतिवादीला पुरेशी संधी देवुनदेखील त्यांनी उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे, अर्जातील कारण हे संयुक्तीक कारण नाही. परंतु, दाव्याची गुण–दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादीला उलटतपास घेण्याची संधी देणे मला आवश्यक वाटत आहे. प्रतिवादीने अर्जामध्ये संयुक्तीक कारण दिलेले नसल्यामुळे व दाव्याचे कामकाज

लांबविल्यामुळे अर्जाचा खर्च त्यांच्यावर ठेवणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:–

:: **आ दे श** ::

०१. अर्ज (निशाणी क्र.६४) रक्कम रु.१०००/-(रुपये एक हजार मात्र) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादीला देण्यात यावी.

०२. खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)

JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2024.07.30 17:04:54 +0530

**भोर.** **(मीना वामन जाधव)**

**दिनांकः ३०/०७/२०२४.** **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, भोर.**

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P. D. F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the14 pt Court | :- | Hon'ble Smt. Meena W. Jadhav<br>C.J.J.D. & J.M.F.C., Bhor, Pune |
| Name of the Steno | :- | M. S. Kondhare L.G. |
| Date of Order | :- | 30/07/2024 |
| Signed by P.O. | :- | 30/07/2024 |
| Order uploaded on | :- | 30/07/2024 |